फौ. कि. अर्ज क्र. २३३/२०२५
केशव वि. अनुसया व इतर
निशाणी क्रमांक ०५ सा. क्र ०१

**पडताळणी कलम २२३ भारतीय नागरीक सुरक्षा संहिता प्रमाणे**

**साक्षीदार क्रमांक ०१ यांचा बयाण**

मी शपथेवर खरे सांगते की,

| | | |
|---|---|---|
| माझे नांव | : | केशव विनायक तिडके, |
| वय | : | ३८ वर्ष, |
| व्यावसाय | : | थर्मल पॉवर ट्रेनिंग, |
| राहणार | : | रा. संगम, ता. परळी वै. जि. बीड |

माझी धारुर या ठिकाणी जमीन आहे त्यानिमित्ताने मी धारुर तहसिल या ठिकाणी गेलो होतो. तेथे माझी रुपाली रमेश सांगळे यांच्यासोबत ओळख झाली होती. त्यांचे गाव खामगाव हे परळी तालुक्यामध्ये वर्ग झाले होते. त्यांचे जमीनीसंबंधी काम असल्याने मी त्यांना म्हटले की, मी परळी तालुक्यात राहातो तुमचे काही काम असेल तर मला सांगा. आमच्या भेटीच्या स्वरुपात प्रेमात रुपांतर झाले. मी रुपालीला सांगितले की, माझे लग्न झालेले आहे मला पत्नी, १ मुलगा व २ मुली आहेत. तरी सुध्दा ती मला म्हटली की माझ्यासोबत लग्न कर. तिने माझ्याकडे वारंवार पैशाची मागणी केली. पैशाच्या मागणीच्या जाचाला कंटाळुन मी तिच्यासोबत २५ मार्च २०२३ रोजी लग्न केले. लग्नामध्ये मी तिला सोडे आठ ते **नऊ** तोळे सोने घातले. त्यानंतर डिसेंबर २०२३ पर्यंत ती माझ्यासोबत नांदली. त्यानंतर घरातील पैसे व सोने घेवुन ती फरार झाली व आतापर्यंत आली नाही. तिच्या नातेवाईकांना मी संपर्क केला असता त्यांनी मला सांगितले की, रुपालीला नांदायला पाठविणार नाही तुला काय करायचे ते करुन घे व माझा नंबर त्यांनी ब्लॉक केला. त्यानंतर मी महिला तक्रार निवारण केंद्र येथे रुपाली नांदायला यावी यासाठी दाद मागितली. तिने एक नोटीस घेतली त्यानंतर तिने कोणत्याही नोटीसा घेतल्या नाहीत व तारखेला हजर राहिली नाही. रुपालीने मला फोन करुन म्हटले की, मी नांदायला येते मला नेण्यासाठी या व मला चाडगाव, ता. धारुर, जि. बीड येथे बोलविले. मी गेलो नाही. त्यावर तिने तिचा एक **भाऊ** माउली रमेश सांगळे तिचे दोन मेहुणे धनराज राजाराम शेरेकर, मनोहर दत्तु आंधळे व लक्ष्मण बबन कांदे यांनी मला रिलायन्स पेट्रोल पंप, शारदाबाई गुरुलिंगअप्पा मेनकुदळे माध्यमिक विद्यालयाच्या समोर अडविले व मला म्हणाले की, तु का आला नाहीस गाडीवर बस. लक्ष्मण बबन कांदे याने मला गचांडीला धरुन मारहाण केली. मला बळजबरी गाडीवर दोघांच्या मध्ये बसवुन चाडगाव, ता. धारुर या ठिकाणी घेऊन गेले. तेथे या

चार जणांनी तसेच रुपालीची आई अनुसया रमेश सांगळे, रुपालीच्या दोन बहिणी अंजली धनराज शेरेकर, दिपाली मनोहर आंधळे यांनी मला मारहाण केली व माझ्याजवळील मोबाईल व खिशातील दोन ते तीन हजर रुपये काढुन घेतले. तेथील गावातील लोकांनी मला गाडीत बसवुन दिले. मी दिंद्रुड येथे आलो व तेथुन परळीला आलो. त्यानंतर मी ग्रामीण पोलिस स्टेशन परळी वैजनाथ येथे तक्रार देण्यासाठी गेलो. त्यांनी मला उपचाराकामी पत्र दिले. त्यावरुन मी सरकारी दवाखाना परळी वैजनाथ येथे गेलो. त्यानंतर मी पुन्हा पोलिस स्टेशनला गेलो त्यांनी मला सांगितले की दिंद्रुड पोलिस स्टेशन येथे तक्रार द्या. त्यानंतर २ ते ३ महिन्यानंतर आरोपींनी माझे, माझ्या पत्नीचे व मुलींचे फोटो इन्स्टाग्रामवर व्हायरल केले. त्यानंतर मला कळाले की रुपालीने लक्ष्मण बबन कांदे याच्यासोबत विवाह केला आहे. तसे मला फोटो दिसले. त्यानंतर त्यांची व माझी भेट झाली नाही. फोनवर आरोपी मला जीवे मारण्याची धमकी देतात.

या नंतर मी सदरचे प्रकरण आरोपी विरुध्द आरोपीला कडक शासन करण्यात यावे याकरीता दाखल केले आहे.

स्वाक्षरीत/—

साक्षीदाराची सही

दिनांक १२/०१/२०२६

माझे समक्ष, श्रवणोत्तर स्विकृत

Digitally signed by DIPAK RUSTUMRAO BORDE
Date: 2026.01.12 15:37:25 +0530

**( दिपक आर. बोर्डे )**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, परळी वै.

( सदरील संचिका ही ऑनलाईन दाखल असल्याने साक्षीदाराची स्वाक्षरी ऑनलाईन पध्दतीने सदर जबाबावर घेण्याची सुविधा नसल्याने साक्षीदाराचा जबाब स्वाक्षरीत करण्यात आला. )